



॥श्री॥

# अनुग्रह

मा. श्री. चं. प. भिशीकर यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेतील काही भाग -

---तरीही चार शब्द लिहीत आहे ते केवळ डॉ. श्री. द. देशमुख यांच्याशी असलेल्या दीर्घ आणि अकृत्रिम स्नेहसंबंधामुळे. अध्यात्म शास्त्राचा सखोल अभ्यास, प्रदीर्घ काळ केलेली गुरुपदिष्ट साधना, अखंड मनन-चिंतन, तीक्ष्ण बुद्धिमत्ता आणि विचारांची स्पष्टता इत्यादी त्यांच्या गुणांचा परिचय अगदी जवळून झालेला आहे. तत्व आणि व्यवहार यांचा सुरेख संगम त्यांच्या ठायी प्रत्ययास आला आहे. म्हणून त्यांचा मजवरील अहेतुक लोभ ही मला मोठी मोलाची गोष्ट वाटते. त्यांच्या इच्छेचा अनादर करणे अशक्य असल्यानेच हे चार शब्द.

अनुग्रहासंबंधी साधकांत आणि अन्य लोकांत देखील फार कुतूहल असते. अनेक समज आणि गैरसमज असतात. परमार्थाचे क्षेत्र प्रदूषित करणाऱ्या मतलबी बुवामहाराजांनीही गोंधळात भर घातली आहे. अशा स्थितीत अनुग्रह म्हणजे नेमके काय, हे सोप्या सुबोध भाषेत कोणातरी अधिकारी पुरुषाने समजावून सांगण्याची फार आवश्यकता होती. सद् गुरू कोणाला म्हणावे ? सच्छिष्य कोण? गुरु-शिष्य संबंधाचे स्वरूप परमार्थामध्ये कशा प्रकारचे असते ? महावाक्य कशाला म्हणतात ? त्याची तात्त्विक बैठक कोणती? अनुग्रह कोणी घ्यावा ? अनुग्रह घेणाऱ्यावर कोणते दायित्व येऊन पडते ? अनुग्रहात कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होतो? इत्यादी अनेक प्रश्न साधकाच्या मनापुढे  येतात. या सर्व प्रश्नांचे शास्त्रशुद्ध विवेचन डॉ. देशमुख यांनी समर्थपणे केले आहे. अनेक मार्मिक उदाहरणांच्या साहाय्याने आणि संत वचनांचा मागोवा घेत त्यांनी सगळा विषय स्पष्ट केला आहे.

---म्हणून ही पुस्तिका छोटीशीच असली तरी तिचे मूल्य निःसंशय मोठे आहे. डॉ. देशमुख यांची या विषयावरील दोन प्रवचने अशा प्रकारे पुस्तिकेच्या स्वरूपात वाचकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रकाशक अभिनंदनास पात्र आहेत. साधकबंधू या पुस्तिकेचे उचित स्वागत करतील, असा विश्वास आहे.

'अनुग्रह' ग्रंथामधील काही भाग -

अनुग्रह कोणी कोणाला द्यायचा हे समजावून घेण्यापूर्वी प्रथम अनुग्रह म्हणजे काय, हे स्पष्ट करूया. अनुग्रह शब्दाचा अर्थ 'कृपा' असा आहे. अनुग्रह शब्दाचा दुसरा अर्थ आहे स्वीकारणं. अनुग्रह शब्दाचा तिसरा अर्थ आहे हाताशी धरण. तीन अर्थ आपल्यासमोर आहेत. अनुग्रह शब्दामध्ये 'ग्रह्' धातू आहे. त्या ग्रह् शब्दाचा अर्थ आहे ग्रहण करणं. ग्रहण करणं म्हणजे स्वीकारणं. ज्याला स्वीकारायचं आहे ते कशासाठी स्वीकारायचं आहे? त्याला आत्मबोधासाठी स्वीकारायचं, हाताशी धरायचं. एखाद्याला हाताशी धरायचा म्हणजे त्याला

अगदी चांगला स्वीकारायचा, आपल्या अगदी जवळ ठेवायचा आणि त्याचे काम पूर्ण होईपर्यंत त्याच्याकडून जे काही साधन करून घ्यायला पाहिजे ते करून घ्यायचे असा हा 'हाताशी धरण' ह्या वाक् प्रचाराचा अर्थ आहे.

अध्यात्मसाधनेत श्रीगुरुंच्या अनुग्रहाच्या कृपेमध्ये एक वैशिष्ट्य आहे. व्यवहारामध्ये एखादा जेव्हा कोणावर कृपा करतो तेव्हा कृपा करणाऱ्याला आपण कृपा करीत आहोत किंवा आपण ती केलेली आहे याची स्पष्ट जाणीव असते. त्याला आपल्या कृतीचा अहंकारही असतो. अध्यात्मशास्त्रामध्ये, परमार्थामध्ये मात्र कृपा करणाऱ्याला आपण कृपा केलेली आहे असे मुळीच वाटत नसत. ज्याच्यावर ती कृपा झालेली आहे त्याला मात्र वाटत असत की आपल्यावर फार मोठी कृपा झालेली आहे. पण कृपा करणारा जो असतो तो 'मी काही करतो' ह्या भूमिकेच्या पलीकडे गेलेला असतो. त्याची हि अकर्तेपणाची भूमिका आपल्या एकदम लक्षात येत नाही आणि समजतही नाही. --

अनुग्रह कशाला करायचा? परमार्थात पारंपरिक पद्धतीने जे काही चालत आलेलं जे काही ज्ञान आहे, चालत आलेली जि काही साधनापद्धती आहे, चालत आलेले जे काही मंत्र आहेत, चालत आलेले जे काही नाम आहे, चालत आलेली जि काही प्रक्रिया आहे, ते सगळं पुढच्याला देणे असे अनुग्रहाचे विशेष स्वरूप आहे. ---
जे अनेक संप्रदाय किंवा अनुग्रहाच्या ज्या अनेक पद्धती आहेत, त्या पद्धतींचा उगम भगवान श्रीशंकरांच्या ठिकाणी आहे. ---त्यामुळे 'मी काही दिल' असं देणाऱ्याच्या मनामध्ये येण्याची शक्यता नाही. कारण की ते त्याच स्वतःच नाही, आणि ते दुसऱ्याला देणं हा त्याच्या कर्तव्याचाच भाग असतो. जे मागून चालत आलेलं आहे ते फक्त पुढच्याला देणं आहे. ---
साधनापद्धती सांगणं हे अनुग्रहाच मूळ स्वरूप आहे. साधनापद्धती सांगणं, साधनेच्या प्रक्रिया सांगणं, साधनेसंबंधी तत्त्वज्ञान सांगणं आणि हे तत्त्वज्ञान सांगतांना व्यक्तीमध्ये विशिष्ट शक्तीच संक्रमण करणं, हे ते स्वरूप आहे. अनुग्रह करणाऱ्याला ती शक्ती परंपरेने मिळालेली असते. ती त्याने शिष्यात संक्रमित करावयाची असते. त्यासाठी अनुग्रहदाता माध्यम असल्यासारखा आहे.

---दुसरं असं की अनुग्रहामध्ये शक्तीच संक्रमण असतं. आता हे शक्तीच संक्रमण कोणी कोणात करायचं असतं, हा विचार थोडासा समजावून घेऊया. ज्याच्याजवळ ही शक्ती आहे त्याने हे संक्रमण करायचं असतं, ह्यात शंका नाही. तसंच ज्याला ही शक्ती पेलण्याची क्षमता आहे, त्याच्यात हे संक्रमण करायचं असतं. दोन गोष्टी आहेत - एक, संक्रमण करणाऱ्याच्या ठिकाणी सामर्थ्य असलं पाहिजे की जे त्याच स्वतःच नसतच तर त्याच्याकडे ते परंपरेने आलेले असतं आणि दोन, जो घेणारा आहे त्या घेणाऱ्यामध्येही काही सामर्थ्य असण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात एकनाथ महाराजांची एक सुंदर ओवी आहे. -
जो शब्दज्ञाने पारंगतु। ब्रह्मानंदे सदा डुल्लतु। शिष्यप्रबोधनी समर्थु। यथोचितु निजभावे॥ (ए. भा. ३-२९८)
अनुग्रह कोणी द्यायचा, त्या देणाऱ्याचा काय अधिकार असावा लागतो, याचा विचार एकनाथ महाराजांनी या ओवीत केला आहे. जो अनुग्रह देणारा आहे, तो शब्दज्ञानामध्ये पारंगत असला पाहिजे. ह्याचा अर्थ त्याला अध्यात्मशास्त्राची संपूर्ण जाण असली पाहिजे. --- तो 'शाब्दे च परे च निष्णातः।' असला पाहिजे. त्याने शब्दज्ञानात पारंगत का असलं पाहिजे? ह्याचे एक कारण आहे. ज्याच्या ठिकाणी हा संप्रदाय संक्रमित करायचा, ज्याला अनुग्रह द्यायचा, त्याच्या मनात शेकडो शंका निर्माण होण्याची शक्यता असते. त्या निर्माण होतातच. मग त्या शंका प्रश्नरुपाने मांडल्या जातात. प्रश्नरुपाने मांडल्या गेलेल्या शंकांच व्यवस्थित समाधान करण्याची क्षमता अनुग्रह देणाऱ्याच्या ठिकाणी असली पाहिजे.
पण केवळ येवढ्याने भागत नाही. 'ब्रम्हानंदे सदा डुल्लतु' असा अनुग्रह देणाऱ्याचा पुढचा अधिकार आहे. अनुग्रहात शब्दज्ञानाचा ब्रह्म तथा आत्मा हा विषय आहे. शब्दज्ञानाने जे ब्रह्म तथा आत्मा नावाचं तत्त्व सांगायचं आहे, त्याचा त्याला अखंड अनुभव असला पाहिजे. ही दुसरी पात्रता आहे. ज्याने अनुग्रह द्यायचा त्याच्याजवळ नुसती शाब्दिक ब्रह्मविद्या असून भागत नाही.

---सध्याच्या ओवीबाबत बोलायचे तर केवळ ह्या किंवा अशा ओव्यांतून केवळ शाब्दिक ज्ञान होते पण त्या ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मात्र अजून दूरच असतो. पण हा प्रत्यक्ष अनुभव केव्हा येईल? जर शास्त्रशुद्ध व संप्रदायशुद्ध योग्य पद्धतीने त्याने सधना केली, तो प्रॉपर चॅनल मधून आला तरच! इथे पुन्हा आणखी एक गोष्ट लक्षात घ्यावी. व्यवहारामध्ये एखाद्याच्या अडचणीचा गैरफायदा घेण्याची सवय अनेकांना असते हे आपल्याला ठाऊक आहे. ती सर्वांच्या परिचयाची आहे. पण परमार्थात अनुग्रह मागणाऱ्याला अडवून ठेवावं आणि आपल्या शिवाय त्याच नडावं ही अहंकाराची कल्पना मुळीच मान्य नाही.

---परमार्थात एक दक्षता ठेवली पाहिजे. व्यवहारातील सगळ्याच्या सगळ्या सवयी ज्या आहेत त्या सगळ्याच्या सगळ्या बाजूला ठेवल्याशिवाय परमार्थामध्ये खऱ्या अर्थाने प्रवेश होतच नाही. व्यवहारातील सारे निकष परमार्थात जर आणले व त्या निकषांवर जर येथील प्रत्येक गोष्ट घासून पाहू लागलो, तर अध्यात्मासंबंधी, परमार्थासंबंधी पुष्कळ गैरसमज निर्माण होतात आणि परमार्थ हा चर्चेचा, टीकेचा विषय होतो.

आता पुढचा मुद्दा आहे, अनुग्रह घ्यायचा कोणी ? अनुग्रह घ्यायला अडचण कोणालाही नाही. ज्याला इच्छा झालेली आहे की आपण अनुग्रह घ्यावा त्याने अनुग्रह घ्यावा. कारण तत्त्वदृष्ट्या अनुग्रह घेणाऱ्याचा 'मोक्ष' हाच अंतिम हेतू असतो. पण स्वीकारणाऱ्यांमध्ये तरतम भाव असतो. हा तरतम भाव अधिकाराच्या दृष्टीने असतो. म्हणून तुकोबारायांचे एक म्हणणे आहे -

'अधिकार तैसा करू उपदेश। साहे ओझे त्यास तेची देऊ॥'

जसा अधिकार असेल तसा उपदेश करू. ज्याला डोक्यावर उपदेशाचे, साधनेचे जेवढे ओझे सहन होईल, तेवढेच ओझे त्याला देऊ. जास्त देणार नाही किंवा कमी देणार नाही. म्हणजे ज्याला 'अंडर युटिलायझेशन' असे म्हणतात तसेही नाही व 'ओव्हर बर्डन्स' म्हणतात तसेही नको. असं दोन्ही प्रकारच तारतम्य ठेवून अनुग्रह दिला जातो. म्हणून 'शिष्यप्रबोधनी समर्थु। यथोचितु निजभावे॥' हा नाथांचा शब्दप्रयोग नीट समजून घेण्याची आवश्यकता आहे.---

--- ह्यासाठी काही गोष्टी सांगाव्या लागतात आणि त्याला म्हणतात एखाद्या प्रक्रियेतून निर्माण झालेलं साधन. एखादी प्रक्रिया सांगायची, त्या प्रक्रियेतून साधन सांगायचं, हा एक भाग. दुसरा भाग आहे नामसाधना आणि तिसरा भाग आहे तत्त्वज्ञान. ध्यान, नाम, आणि ज्ञान या तिन्ही मिळून अनुग्रह नावाची गोष्ट पूर्ण होते. हे सर्व एकमेकांना अतिशय पूरक आहेत. ---

श्रीगुरू एक नाम सांगतात. उदा. 'श्रीराम जयराम जय जय राम।'. आता नाम सांगितल्यानंतर रामाचं स्वरूप काय आहे हे जर मला समजून घ्यायचं असेल तर मला तत्त्वज्ञानाची कास धरल्याशिवाय, तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्याशिवाय गत्यंतर नाही. रामाच खरं स्वरूप समजल्याशिवाय 'श्रीराम जयराम जय जय राम।' ह्या नामसाधनेला एक उंची मी देऊ शकणार नाही. ती उंची दिल्याशिवाय नामसाधनेचे रुपांतर ध्यानामध्ये होणार नाही. ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. नामसाधनेला ध्यानाचा दर्जा आला पाहिजे, नामसाधना ध्यानाच्या उंचीवर गेली पाहिजे. अनेकवेळा असं होतं की खाता-पिता, उठता-बसता नाम घ्या असं सांगितलं जातं. ---- हे फार चांगलं आहे त्याची आवश्यकता आहे पण तेवढ्याने भागतं हा विचार मात्र बरोबर नाही. आपली साधना एक मोठ्या उंचीवर घेऊन जाण्याची आवश्यकता आहे. त्या नामसाधनेला ध्यानाचा दर्जा यावयास पाहिजे. ध्यानाचा दर्जा द्यायचा असेल तर 'राम' काय आहे हे समजून

घेतलं पाहिजे. रामाचा आणि माझा संबंध काय हेही समजून घेतलं पाहिजे. करुणाष्टकांमध्ये एक फार छान विचार समर्थांनी मांडलेला आहे. समर्थ करुणाष्टकात रामाला म्हणतात, 'तुझिया वियोगे जीवित्व आले'. करुणाष्टकं रोज म्हटली, बारा बारा वर्षे नियमाने म्हटली, पण 'तुझिया वियोगे जीवित्व आले' हे समर्थांच म्हणणं जर मला समजलं नही तर मला करुणाष्टकाचा उपयोग कितीसा झाला, हा एक प्रश्न आहे.

--- समर्थांच्या शब्दात सांगायचे तर ते तत्त्व 'जे असतची असे' असे आहे. म्हणजे शास्त्रीय भाषेत 'अनादि-नित्य-सत्य' असे ते तत्त्व आहे. जे सर्वत्र आहे, सदा आहे, ते सर्वत्र समत्वाने आहे. कोणात कमी अगर कोणात जास्त नाही. असं जे एक ब्रह्मतत्व आहे त्या तत्त्वाचा आपल्याला अनुभव घ्यायचा आहे. परमार्थाचे हेच ध्येय आहे. हा विचार लक्षात घेणं, लक्षात घेतल्यानंतर त्याच साधनेत रुपांतर करणं, साधनेत 'ते मी आहे' असं रुपांतर केल्यानंतर प्रत्यक्ष ते मी आहे असा अनुभव घेणं हे परमार्थसाधनेच स्वरूप आहे. श्रीगुरू आपल्याला महावाक्यातून नेमकं तेच समजावून सांगतात की 'ते तू आहेस' म्हणजे 'तत्वमसि' हे महावाक्य हा अनुग्रहाचाच एक आवश्यक भाग आहे.

महावाक्याचा उपयोग काय? महावाक्य काय करतं? याबाबत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात -
'जेणे भ्रांतीपासुनी हिरतले। गुरुवाक्ये मनं धुतले। मग आत्मस्वरुपी घातले। रोऊनियां॥'

मनाच्या श्लोकामध्ये सुद्धा मनाचे अनेक मळ घालविण्यासाठी समर्थांनी उपदेश केला आहे. 'मना सज्जना भक्तिपंथेची जावे' अशी सुरवात केली आहे आणि मग 'हे नसू दे, ते नसू दे' अशा पद्धतीचे पुष्कळ विचार मांडलेले आहेत. हेतू एकच आहे की मन स्वच्छ राहावं. पण कर्माच्या दृष्टीने, आचरणाच्या दृष्टीने आणि विचारांच्या दृष्टीने जरी मन स्वच्छ झालं तरी भ्रम नावाची गोष्ट तशीच राहते. भ्रमाचा मळ तसाच राहतो हे आमच्या लक्षात येत नाही. ---

घर शब्दाची व्याप्ती जरा वाढवून म्हणूया की ज्या जगामध्ये आपण वावरतो, त्या जगातील घटनांकडे जर आपल्याला निष्क्रिय साक्षित्वाने पाहता आलं तर आनंदाचे निधान आपल्या हाती लागते. निष्क्रिय साक्षित्व जिथे असतं तिथे आसक्ती नसते आणि जिथे आसक्ती नसते तिथे आनंदाला धक्का लागत नाही. तृप्तीला धक्का लागतो तिथे दुःख असतं अशी साधी सरळ विचारसरणी वेदांताची आहे.

***